ISBN - **978-81-947409-5-7**

शब्दसंचय

SHABDSANCHAY

Peer Reviewed and Refereed

विश्व साहित्य व मराठी साहित्य : वैश्विक परिप्रेक्ष्य

August – September 2021

Editor

Ganesh D. Saoji

Painganga Prakashan, Mehkar

शब्दगुंचय

विश्व साहित्य व मराठी साहित्य : वैश्विक परिप्रेक्ष्य

ISBN - **978-81-947409-5-7**

पैनगंगा प्रकाशन

INDEX

1	**मध्ययुगीन साहित्यातील संत कवयित्रींचे योगदान** प्रा. मीरा दत्तू गायकवाड	1 - 12
2	**पंढरपूरची वारी : एक अभ्यास** अंकुश भागवत सोनवणे	13 - 21
3	**वारकरी संप्रदाय व संत तुकारामांचे तत्वज्ञान** लक्ष्मण गजानन गणगे	22 - 31
4	**मराठी मुस्लीम कादंबरीतील भाषा** विलास माणिकराव शिंदे	32 – 39
5	**वैश्विक साहित्यात संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचे स्थान** स्मिता संदेशराव मांडेकर (नागपूरकर)	40 – 43
6	**गो.पु.देशपांडे यांची प्रायोगिक नाटके** प्रा.डॉ.विश्वास पाटील (कौलवकर)	44 – 48
7	**प्रतिमा इंगोले यांच्या "पार्टटाईम"मधील शैक्षणिक जीवनजाणीव** **डॉ. पंढरी डोईफोडे**	49 – 63
8	**महात्मा बसवेश्वर यांचे विचार : वैश्विक परिप्रेक्ष्य** सायली उमाकांत शेटे	64 – 66
9	**विश्वसाहित्य व मराठी साहित्य : व्याप्ती व मर्यादा** डॉ. विष्णू नामदेव लांडे	67 – 73
10	**विश्वसाहित्य संकल्पना व स्वरूप** डॉ.मिलिंद भिवाजी कांबळ	74 – 78
11	**जैन साहित्य में वर्णित आर्थिक तत्त्वों का ऐतिहासिक अध्ययन** **डॉ. प्रा. कविता आर. तातेड**	79 – 90
12	**" खरा तो एकचि धर्म "** **डॉ. द. प्र. डुंबरे**	91 – 93
13	**अण्णा भाऊ साठे यांच्या कथा साहित्यातील समाजवास्तव** **चित्रलेखा गाठाळ**	94 – 100
14	**आंबेडकरवादी विचार धारा : ओमप्रकाश वाल्मिकी** **जया शिंदे**	101 - 104

शब्दगंधचुय
विश्व साहित्य व मराठी साहित्य : वैश्विक परिप्रेक्ष्य
ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

९

विश्वसाहित्य व मराठी साहित्य : व्याप्ती व मर्यादा

डॉ. विष्णू नामदेव लांडे,
मराठी विभाग प्रमुख,
मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, वाशीम जि. वाशीम

मराठी भाषेतील साहित्य हे अथांग सागरासारखे पसरलेले आहे. आजतागायत कितातरी नामांकित साहित्यिक हे मराठी साहित्यविश्वात होऊन गेले आहेत. सद्यस्थितीत मराठी साहित्य विश्वात विविध साहित्य प्रवाह, साहित्य प्रकार आढळतात. असे असतानाही मराठी साहित्य विश्व हे जागतिक साहित्याच्या तुलनेत काहीसे कमी पडत असताना दिसते. मराठी साहित्य विश्व हे बहुआयामी असतानाही, हे साहित्य मराठी भाषिकांच्याशिवाय फारसे पुढे जाताना दिसत नाही. मराठी साहित्य हे जागतिक साहित्याच्या तुलनेत काहीसे कमी पडत असल्याचे दिसते, त्याबाबतची कारणमींमासा प्रस्तुत शोधनिबंधातून करण्याचा प्रयत्न आहे.

प्रथमता विश्व साहित्य म्हणजे काय हे समजून घेणे गरजेचे वाटते. विश्वसाहित्य ही संकल्पना प्रथमता गटे यांनी वापरली. त्यांनी विश्वसाहित्यासाठी योजिलेली मूळ जर्मन संज्ञाWeltlitaratur अशी होती. पुढेचालून या संज्ञेचेWorld Literatureअसे रूपातंरण झाले. ही संकल्पना अनेकविध अभ्यासकांनी विविध अर्थाने वापरली. जगातील एकूणच साहित्य हे कधी तरी एकात्म होईल, अशी गटेंची धारणा होती.

न. चि. केळकर साहित्याच्या बाबतीत अक्षर साहित्य हा शब्दप्रयोग करतात. ते याबाबतीत म्हणतात ''प्रत्येक पिढीची अभिरूची आणि स्मरणशक्ती या जोडचाळणीतून गाळल्यावर जे शिल्लक राहते ते अक्षर वाङ्मय होय''

ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

अक्षर वाङ्मयाचे निकष समजून घेताना असे निदर्शनास येते की, अक्षर साहित्य हे नेहमी चिरतरूण स्वरूपाचे असते. ते कधीही वार्धक्याकडे झुकत नाही. कोणत्याच काळात मृत होत नाही. हे साहित्य कधीही शिळे होत नाही. ते नेहमी ताजे, टवटवीत, प्रफुल्लित असते. ते नवसंजीवन स्वरूपाचे असते. प्रत्येकवेळी हे साहित्य वाचावेसे वाटते. नित्यनूतन असे असते. एकच एक अर्थ त्यातून ध्वनित होताना दिसत नाही. विविध अर्थछटा त्यातून उत्पन्न होतात. प्रत्येक वाचनातून काहीसा नवीन अर्थ निघत असतो. अक्षर साहित्याला स्थल, काल, वेळ यांच्या मर्यादा कधीच असू शकत नाहीत. हे साहित्य स्थल, काल, वेळ सापेक्ष कधीही नसते. तात्कालिक काळासाठी हे साहित्य कधीच निर्माण होऊ शकत नाही. या साहित्याला कोणत्याही भाषेची मर्यादा असू शकत नाही. यामुळे साहित्याचे श्रेष्ठ–कनिष्ठ असे मूल्यमापन करता येते. या साहित्यात पूर्वग्रहदूषितता आढळत नाही. यामुळे भिन्न भाषा, शैली, राष्ट्र, संस्कृती इ.ना एकाचवेळी अभ्यासता येते. हे साहित्य विश्वात्मक असे असते. यातून संपूर्ण विश्वाला आवाहन केले जाते. ज्यामुळेच हे साहित्य राष्ट्राच्या सीमा ओलांडून अखिल विश्वात कौतुकास पात्र ठरत असते. साहित्याचे श्रेष्ठ–कनिष्ठ असे मूल्यमापन करता येते. आपल्या भाषेबद्दलचा नकारात्मक दृष्टिकोण बदलता येते.

अक्षर साहित्याचे हे जे निकष सांगितले जातात, या निकषात मात्र अधिक तर मराठी साहित्य बसू शकत नाही. यामध्ये काहीच मर्यादित साहित्यिकांचा व त्यांच्या साहित्याचा समावेश होताना दिसतो. ज्यामध्ये रामायण व महाभारत हे ग्रंथ, श्रीमदभगवद्गीता, ओडिसी, आऊटसायडर, शेक्सपिअरची नाटके, रवींद्रनाथ टागोरांची गीतांजली, संत ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी, संत तुकारामांची अभंगगाथा, टॉलस्टॉयची वॉर अँड पिस, मुन्शी प्रेमचंदचे साहित्य, उमरखय्यामचे साहित्य, कालिदासांची नाटके यासारख्या कलाकृतींचा समावेश होताना दिसतो. या साहित्यकृतीत अपवाद वगळता इतर मराठी साहित्यिक व साहित्याचा समावेश असल्याचे दिसत नाही, याबाबतची कारणमींमासा पुढीलप्रमाणे करता येईल.

इंग्रजी भाषा ही जागतिक दर्जाची भाषा म्हणून ओळखल्या जाते. ही भाषा जवळपास संपूर्ण जगतामध्ये बोलल्या व लिहिल्या जाते. त्यामुळे या भाषेचे सर्वत्र प्रहस्थ असल्याचे दिसून येते. इंग्रजी भाषेचा अभ्यास सर्वत्र केला जातो. त्यामुळे या भाषेतील साहित्य हे संपूर्ण जगभर वाचल्या जाऊ शकते. त्यामुळे या भाषेतून व्यक्त

ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

झालेले अनुभव हे सर्वत्र वाचल्या जाऊ शकतात. यामुळे हे साहित्य वैश्विक दर्जाचे ठरण्यास मदत करते. या तुलनेत मराठी भाषेतील साहित्य मात्र मागे राहताना दिसते.

इंग्रज, फ्रेंच, डच, अमेरिकन यांनी जगातील अनेकविध राष्ट्रात, आपली सत्ता प्रस्थापित केली. त्या त्या राष्ट्रात त्यांनी आपल्या राष्ट्राचा, भाषेचा, संस्कृतीचा व साहित्यविश्वाचा प्रचार आणि प्रसार करण्याचे काम केले. बऱ्याच ठिकाणी त्यांनी स्थानिक भाषेला दडपूण टाकण्याचाही प्रयत्न केला. यामुळे त्यांच्या भाषेचा विकास होत गेला. तर दुसरीकडे मराठी भाषिकांनी जगातील कोणत्याही राष्ट्रावर आक्रमण केलेले दिसत नाही. आपली भाषा इतरावर लादण्याचाही प्रयत्न केला नाही. त्यामुळे मराठी साहित्य विश्वात कितीतरी श्रेष्ठ दर्जाच्या कलाकृती निर्माण होऊनही, त्यांना विश्व साहित्यामध्ये मात्र स्थान मिळालेले दिसत नाही.

मराठी भाषा ही प्रादेशिक भाषा आहे. महाराष्ट्र व गोवा या राज्यातच ही भाषा बोलली व लिहिल्या जाते. या राज्यात या भाषेला राजभाषेचा दर्जा असलेला दिसून येतो. याशिवाय देशातील मध्यप्रदेश, कर्नाटक, राजस्थान, उत्तरप्रदेश यासारख्या विविध राज्यांत ही भाषा काही प्रमाणात बोलली जाते. परंतु राजभाषा म्हणून मात्र तिचा वापर अन्यत्र ठिकाणी झालेला दिसत नाही. मराठी भाषा बोलणाऱ्यांची संख्या जगातील इतर भाषेच्या तुलनेत अधिक असली तरी, ही भाषा काहीच प्रदेशातच बोलली व लिहिली जात असल्याने, या भाषेतील साहित्यास विश्वसाहित्य ठरण्यासाठी काहीशा मर्यादा पडताना दिसून येतात. मराठीतून व्यक्त झालेले अनुभवविश्व आपल्याच देशातील इतर भाषिकांनाही समजत नाही, त्यामुळे या भाषेतील साहित्य विश्वसाहित्य होण्यापासून काहीसे दूरच असल्याचे दिसते.

मराठी भाषेतील साहित्याचे अनुवाद किंवा भाषांतर हे अल्पप्रमाणात झालेले दिसतात. आपल्या भाषेत व्यक्त झालेले अनुभव, इतर भाषिकांना समजत नाहीत. आपल्या भाषेतील अनुभव इतरांना समजण्यासाठी त्या साहित्याचे अनुवाद किंवा भाषांतर होणे गरजेचे असते. अनुवादामुळे साहित्य हे जगातील कानाकोपऱ्यात पोहचू शकते. त्या त्या साहित्यातील अनुभव विश्व संपूर्ण जगतापर्यंत पोहचवल्या जाऊ शकते. त्यामुळे कोणत्याही साहित्याला भाषिक मर्यादा पडू शकत नाही. ते साहित्य वैश्विक दर्जाचे साहित्यही होऊ शकते. परंतु मराठी

ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

साहित्याचे पाहिजे त्या प्रमाणात अनुवाद व भाषांतर न झाल्याने, या भाषेतील साहित्य वैश्विक साहित्य होण्यापासून काहीसे दूर असल्याचे दिसून येते.

मराठी भाषेतील निर्माण झालेले साहित्य हे विश्व स्तरावर पोहोचविण्यासाठी, या भाषेतील साहित्याचे अनुवाद किंवा भाषांतर होणे गरजेचे आहे, त्यासाठी या भाषेतील मूळ साहित्याचे अनुवाद किंवा भाषांतर करण्यासाठी शासन स्तरावरून मोठ्याप्रमाणात अनुदान मिळाले पाहिजे. मराठी भाषेत निर्माण झालेल्या प्रत्येक श्रेष्ठ साहित्यकृतीचे अनुवाद होणे गरजेचे आहे. कोणतेही साहित्य अनुवादित करण्यासाठी, अनुदानाची अत्यंत आवश्यकता असते. परंतु असे प्रयत्न फार कमी प्रमाणात झालेले दिसतात. अनुदानाच्या अभावामुळेही हे साहित्य जागतिक स्तरापर्यंत अल्प प्रमाणात पोहोचलेले दिसून येते.

मराठी भाषा ही बहुतांश अवस्थेत गुलामगिरीतच राहिलेली दिसून येते. मराठी भाषिक समाजावर अनेकांनी आक्रमण केलेले दिसते. त्यामुळे या भाषेतील साहित्यिक अगदी खुल्या पध्दतीने आपले अनुभव विश्व रेखाटू शकले नाहीत. बऱ्याचदा चाकोरीतच त्यांनी आपले अनुभव रेखाटन केलेले दिसतात. गुलामगिरीमुळेही मराठी साहित्यिकांना अनुरूप असे लेखन स्वातंत्र्य मिळालेले दिसत नाही. मराठी साहित्य निर्मितीचा प्रारंभ काळ हा तर आंग्ल साहित्याचे अनुवाद किंवा भाषांतर करण्यातच धन्यता मान्यता होता, त्यामुळेही हे साहित्य इंग्रजी भाषेच्या तुलनेत काहीसे मागे राहिल्याचे दिसून येते.

मराठी भाषेतील साहित्यिकांनी साहित्य निर्माण करताना संत–पंत–तंत, कलावाद, जीवनावाद, सूरगाठ–निरगाठ–उकल, मुक्तछंद अशा काहीशा बंदिस्त चौकटीतच साहित्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळेही मराठी भाषेतील साहित्य हे जागतिक साहित्य म्हणून छाप टाकण्यात काहीसे मागे राहिलेले दिसते.

मराठी साहित्य हे अधिकतर संस्कृतीप्रिय असल्याचे दिसते. अधिक तर मराठी साहित्यिकांनी महाराष्ट्रीयन संस्कृती ही आपल्या साहित्यकृतीतून अविष्कृत करण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. महाराष्ट्रीयन संस्कृती ही मराठी साहित्यिकांच्या नजरेत श्रेष्ठ असल्याचे दिसून येते. कोणत्याही साहित्यिकाला आपली संस्कृती ही श्रेष्ठ वाटत असते, ते स्वाभाविकही आहे. आपल्या देशात, आपल्या राज्यात महाराष्ट्रीयन संस्कृती कदाचित

ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

श्रेष्ठ असेल ! पण जागतिक तुलनेत आपली संस्कृती काहीसे मागे पडत असल्याचे दिसून येते. महाराष्ट्रीयन संस्कृती जागतिक तुलनेत पाहिजे तसा प्रभाव पाडू शकली नाही, त्यामुळेही मराठी साहित्य वैश्विक साहित्याच्या तुलतेन कमी पडताना दिसते.

मराठी भाषेत लिहिलेले साहित्य हे विविध पुरस्कारापासून वंचित असलेले दिसते. जागतिक स्तरावरील साहित्य क्षेत्रातील पुरस्कार हे मराठी कलाकृतीला फारसे मिळाल्याचे दिसत नाही. त्यामुळेही मराठी भाषेतील साहित्य हे जागतिक भाषेच्या तुलनेत काहीसे दूर्लक्षित असल्याचे दिसते. आपल्या देशात, साहित्य क्षेत्रातील ज्ञानपीठ हा पुरस्कार सर्वोच्च स्वरूपाचा मानल्या जातो. हा पुरस्कार आतापर्यंत मराठीतील वि.स. खांडेकर, कुसुमाग्रज उर्फ वि.वा.शिरवाडकर, विंदा करंदीकर व भालचंद्र नेमाडे या चार साहित्यिकांनाच मिळालेला आहे. या चार साहित्यिकांव्यतिरिक्त इतर साहित्यिकांना हा पुरस्कार मिळाल्याचे दिसत नाही. मराठी भाषा इतकी समृध्द असतानाही या भाषेतील अधिक तर श्रेष्ठ दर्जाचे साहित्यक हे ज्ञानपीठच काय, इतर देशातील अन्य पुरस्कारापासूनही दूर असल्याचे दिसतात. साहित्य अकादमी हा पुरस्कार राज्य स्तरावरून दिल्या जात असतानाही, मराठीतील अनेकविध साहित्यिक हे या पुरस्कारापासून कोसो दूर आहेत. पुरस्कारामुळे त्या त्या साहित्यकृतीची काही प्रमाणात का होईना ओळख होत असते. पण पुरस्काराच्या दूर्लक्षामुळे एखादी चांगल्या दर्जाची कलाकृतीही मागे राहू शकते.

मराठी भाषेतील कितीतरी कलाकृती ह्या समस्याप्रधान आहेत. अनेकविध कलाकृतीतील समस्या ह्या महाराष्ट्र किंवा आपल्या देशापुरत्याच मर्यादित आहेत. राज्य किंवा राष्ट्रीय स्तरावरील अनेकविध समस्या साहित्यातून अविष्कृत झाल्यानंतर, ते ते साहित्य बऱ्याचदा लोकप्रिय व वाचनीय ठरते. असे साहित्य मराठी भाषेमध्ये श्रेष्ठ दर्जाचे साहित्य म्हणून नावलौकिकही मिळविताना दिसते. माणसांच्या जीवनात भोग महत्वाचा की त्याग महत्वाचा ? हे अधोरेखित करणारी 'ययाती' ही कादंबरी मराठी साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरताना दिसते. दारूच्या समस्येमुळे होणारी शोकांतिका 'एकच प्याला' मधून दर्शविली जाते. कलाकार व वयोवृध्दांची होणारी शोकांतिका 'नटसम्राट' मधून दिसून येते. शिक्षण व्यवस्थेतील कायम विनाअनुदानित तत्वावरील धोरणाची दशा व दिशा 'कोंडणातलं जिण' मधून व्यक्त होते. जीवनात संघर्ष हाच सर्वस्व असल्याचा अनुभव 'धग' मधून

ISBN - 978-81-947409-5-7
पैनगंगा प्रकाशन

मिळतो. जरठ–कुमारी विवाहाची समस्या 'शारदा' मधून अधोरेखित होते. भाऊबंदकीच्या समस्येचे चित्रण 'भाऊबंदकी'तून मिळते. धरणग्रस्तांच्या समस्येचे चित्रण 'झाडाझडती' मधून होते. उपक्षित कर्णाच्या तेजस्वी पराक्रमाचे चित्रण 'मृत्यूजंय' मधून होते. प्रेमातील प्रेमीयुगुलांची समस्या 'रणांगण' मधून चित्रीत होते. सुभाषबाबूंच्या संघर्षमय प्रवासाची कहाणी 'महानायक' मधून चित्रीत होते. यासारख्या कितीतरी कलाकृती मराठी साहित्यविश्वात श्रेष्ठ साहित्य कलाकृती ठरलेल्या आहेत. असे असतानाही मराठीतील साहित्यविश्व जागतिक साहित्याच्या तुलनेत फिके पडते. असे असले तरी मराठी साहित्य विश्व हे वैश्विक साहित्याच्या तुलनेत कुठेच बसू शकत नाही, असे मात्र म्हणता येत नाही. कारण मराठी भाषा ही एक प्रादेशिक भाषा आहे हे विसरून चालणार नाही. महाराष्ट्र किंवा देशामध्ये असलेली विविधता ही इतर देशात आढळत नाही. त्यामुळे विश्वसाहित्य व मराठी साहित्य यांची तुलना करू पाहता असे निदर्शनास येते की, इंग्रजी सारख्या भाषेला फार मोठी परंपरा आहे. या भाषेच्या राज्यकर्त्यांनी अनेकविध देशात आपली अधिसत्ता निर्माण केली. त्यांनी प्रसंगी त्यांच्याच भाषेचा, संस्कृतीचा, साहित्याचा प्रचार व प्रसार करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक भाषेची मुस्कटदाबीही केली. परिणामी अनेक भाषा मागे राहिल्या. पुढेचालून त्या मागेच राहत गेल्याचे दिसते. आक्रमकांच्या आक्रमणामुळे मागे राहिलेल्या भाषेमध्येच मराठी भाषेचाही समावेश होतो.

यावरूनच विश्वसाहित्य आणि मराठी साहित्य यांची तुलना करू पाहता असे निदर्शनास येते की, विश्वसाहित्याच्या तुलनेत मराठी साहित्य काहीसे मागे पडतांना दिसते. नाममात्र मराठी साहित्यिक हे विश्वसाहित्यात आपला ठसा उमटू शकले. मराठी साहित्य हे बहुआयामी असूनही विश्व साहित्यापासून काहीसे दूर असलेले दिसते. इंग्रजी भाषा ही जागतिक दर्जाची भाषा आहे, त्या तुलनेत मराठी भाषा प्रादेशिक असलेली दिसून येते. इंग्रजी भाषेचा प्रसार, प्रचार करण्यासाठी मोठ्यप्रमाणत प्रयत्न झालेले दिसतात, त्या तुलनेत मराठी भाषेचा विश्व स्तरावर प्रचार, प्रसारासाठी प्रयत्न झालेले दिसून येत नाही. इंग्रजी भाषा ही सत्ताधार्‌यांची भाषा आहे, तर दुसरीकडे मराठी भाषा मात्र बहुतेक दिलस गुलामगिरीतच वाढलेली दिसून येते. इंग्रजी साहित्याला खूप जुनी परंपरा व वारसा लाभलेला दिसून येतो, तर दुसरीकडे मराठी भाषा मात्र आधुनिक भाषा असलेली दिसून येते. इंग्रजी साहित्याचे भाषांतर व अनुवाद हे मोठ्यप्रमाणात मराठी साहित्यविश्वात झालेले दिसतात,

ISBN - **978-81-947409-5-7**
पैनगंगा प्रकाशन

परंतु मराठी भाषेतील साहित्य जगातील इतर भाषेत अनुवादित करण्याचे पाहिजे तसे प्रयत्न झालेले दिसून येत नाहीत. आपल्या देशातील व राज्यातील समाजजीवन व समस्येचे प्रतिबिंब मराठी साहित्यातून उमटले आहे. अशा कितीतरी कलाकृती साहित्य क्षेत्रात उंचीला पोहोचल्या आहेत. परंतु जागतिक स्तरावरील समस्या व भारतातील समस्या या भिन्न असल्याने, मराठी साहित्य हे विश्व साहित्याच्या तुलनेत काहीसे कमी पडत असल्याचे वाटते.